पुणे विभागीय मंडळ, पुणे - ४११००५

MAHARASHTRA STATE BOARD OF SECONDARY & HIGHER SECONDARY EDUCATION,
PUNE DIVISIONAL BOARD, PUNE - 411005

DIVISIONAL CHAIRMAN
25536722 (OFF)

DIVISIONAL SECRETARY
25536781/82/83 / 25536712(OFF)

FAX- 020/25536761
E-MAIL - sscboardpune@gmail.com
Website- www.sscboardpune.in

महत्वाचे
ऑनलाईन परीक्षा
माहिति तंत्रज्ञान

क्रमांक:पुविमं/शाखा ब/ऑन लाईन/ 5366
पुणे-४११००५.
दिनांक:-१८/०६/२०२६
2/7/2026

प्रति,
प्राचार्य,
पुणे, अ.नगर, सोलापूर,

विषय: उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (१२वी) जून-जुलै २०२६ माहिति तंत्रज्ञान या विषयाच्या ऑनलाईन परीक्षेकरिता पर्यवेक्षक व तांत्रिक सहाय्यकांच्या नियुक्तीबाबत...

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा (१२वी) जून-जुलै २०२६ मधील आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थी परीक्षेमध्ये माहिती तंत्रज्ञान हा विषय घेऊन प्रविष्ठ होणार आहेत. माहिती तंत्रज्ञान विषयाची नियमित विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा (८० गुण) ऑनलाईन पध्दतीने होणार आहे. ऑनलाईन परीक्षेचे केंद्र आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाची **संगणक प्रयोग शाळा** राहील. संगणक प्रयोगशाळा व संगणक **यंत्रणा** परीक्षेसाठी सुसज्ज करण्यात यावी. माहिती तंत्रज्ञान विषयाच्या ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना लेखी परीक्षा केंद्रावर पाठवू नये. त्यांची परीक्षा आपल्याच कनिष्ठ महाविद्यालयातील संगणक प्रयोग शाळेमध्ये घेण्यात येणार आहे.

ऑनलाईन परीक्षेच्या केंद्राचे **केंद्रसंचालक** म्हणून आपली नियुक्ती करण्यात आली आहे. ऑनलाईन परीक्षेचे संचालन आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे केले जाणार असल्यामुळे आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विषयाच्या शिक्षकाची **तांत्रिक सहाय्यक** म्हणून नियुक्ती आपण करावी व **संबंधितांना नियुक्तीचे पत्र आपल्या सही शिक्क्यासह प्रपत्र दोन नमुन्यानुसार दयावे.**
ऑनलाईन परीक्षेच्या पर्यवेक्षकाच्या नियुक्त्या या फेब्रु/मार्च २०२६ च्या नियुक्त्यांप्रमाणेच कायम राहतील याची नोंद घ्यावी. तसेच संबंधीतांना तसे पत्राद्वारे कळविण्यात यावे, व सोबतच्या नमुन्यात माहिती भरुन एक प्रत मंडळ कार्यालयाकडे तात्काळ पाठविण्यात यावी. तसेच ज्या कनिष्ठ महाविद्यालयांना फेब्रु/मार्च २०२६ आय.टी. ऑनलाईन परिक्षेसाठी पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली नव्हती त्यांनी नजिकच्या कनिष्ठ महाविद्यालयातील पर्यवेक्षकांची नियुक्ती करून त्यांना नियुक्ती आदेश पाठवावेत व सोबतच्या नमुन्याप्रमाणे मंडळ कार्यालयाकडे माहिती जमा करावी. **नियुक्ती पत्र देताना पुढील बाबींचा विचार करावा.**
अ) कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये शिकवित असलेल्या व्यक्तींमधूनच पर्यवेक्षकांची नियुक्ती

Scanned with OKEN Scanner

करण्यात यावी.

ब ) पर्यवेक्षक हा संगणक साक्षर असून संगणकावर काम करता येणारा असल्याची खात्री करावी.

क) पर्यवेक्षक कनिष्ठ महाविद्यालयीन स्तरावर महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विषय शिकविणारा नसावा.

ड) सदर परीक्षा २ दिवस १ सत्रांमध्ये असल्यामुळे प्रत्येक केंद्रावरील ०१ ते २५ विद्यार्थ्यांच्या गटाकरिता एक या प्रमाणे योग्य संख्येने पर्यवेक्षकांची नियुक्ती आपल्या स्तरावर करावी.

**ऑनलाईन परीक्षेसाठी अखंडीत विद्युत पुरवठा, दुरध्वनी सेवा व इंटरनेट कनेक्टिव्हिटी आवश्यक असल्याने आपण आपल्या कार्यक्षेत्रात विभागीय/जिल्हा स्तरावरील संबंधित यंत्रणेशी संपर्क साधून त्यांच्या अखंडीत सेवा उपलब्धतेबाबत आवश्यक ती कार्यवाही करावी.**

**ऑनलाईन परीक्षा नियोजनाकरिता http:// examinfo.mh-hsc.ac.in व सामान्यज्ञान (जी.के.) ही वेबसाईट दररोज पहावी.**

माहिती तंत्रज्ञान विषयाची आपल्या कनिष्ठ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांची ऑनलाईन परीक्षा सुनियोजित पध्दतीने पार पाडण्यासाठी वैयक्तिक लक्ष देऊन कार्यवाही करावी.

MBRaut
विभागीय सचिव,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे-४११००५.

प्रत माहितीसाठी:

मा. सचिव, महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे-४११००४

Scanned with OKEN Scanner

बहिर्गत पर्यवेक्षक नियुक्तीबाबत सांकेतांक क्र.

प्रति,

मा. विभागीय सचिव,
महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च,
माध्यमिक शिक्षण मंडळ,
पुणे विभागीय मंडळ,
पुणे ४११००५.

विषय:— उच्च माध्यमिक प्रमाणपत्र पुरवणी परीक्षा जून/जूलै २०२६ माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान परीक्षेत बहिर्गत पर्यवेक्षक नियुक्तीबाबत...

महोदय,

उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा जून/जूलै २०२६ साठी माहिती तंत्रज्ञान (आय.टी.) व सामान्यज्ञान (जी.के.) या विषयांच्या ऑनलाईन परिक्षेसाठी आमच्या कनिष्ठ महाविद्यालयात खालीलप्रमाणे बहिर्गत पर्यवेक्षकांची नियुक्ती करण्यात आलेली आहे.

| अ. क्र. | बहिर्गत पर्यवेक्षकाचे नाव | क.म.नाव | क.म. सांकेतांक क्र. | विषय |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |

उपरोक्तप्रमाणे नियुक्ती करण्यात आली असून हे निर्धारीत दिनांकास बहिर्गत पर्यवेक्षक म्हणून काम पाहतील तसेच मंडळाच्या सूचनांचे पालन करतील माहिती तंत्रज्ञान व सामान्यज्ञान या विषयांची ऑनलाईन परीक्षा सुरळीतपणे पार पडेल याची आम्ही हमी देतो.

आपला विश्वासू,
प्राचार्य
कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव व शिक्का

Scanned with OKEN Scanner